स्वप्ने सत्यात उतरवण्या अगोदर प्रथम त्या तुम्हाला बघावे लागतील.

दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार २५ जुले २०२५ | अंक २१६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# मुख्यमंत्री फडणवीसांसमोरच दिल्लीत विद्यार्थ्यांचं आंदोलन, जोरदार घोषणाबाजी

राज्यात सध्या हिंदीचा मुद्दा चांगलाच तापला आहे. पहिलीपासून हिंदीची सक्ती नको, अशी भूमिका महाराष्ट्रातील अनेक पक्ष आणि संघटनांची आहे. मनसेन या विरोधात मोठं आंदोलन उभारलं होतं, त्यानंतर शिवसेना ठाकरे गटानं देखील या आंदोलनात उडी घेतली, दरम्यान महाराष्ट्रात राहून आम्ही मराठी बोलणार नाही, अशी भूमिका घेणाऱ्या इतर भाषिकांविरोधात मनसे, चांगलीच आक्रमक झाल्याचं देखील पाहायला मिळालं.दरम्यान राज्यात हिंदी भाषेच्या मुद्द्यावर दबाव वाढल्यानं अखेर राज्य सरकारने देखील त्रिभाषा सूत्राबाबतचे दोन्ही जीआर मागे घेतले. त्यानंतर मुंबईत विजयी मेळावा पार पडला. हिंदीच्या मुद्द्यावरून राज्यात वातावरण तापलेलं असतानाच आता दिल्लीतून मोठी बातमी समोर येत आहे, ती म्हणजे दिल्लीत विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोरच आंदोलन केलं आहे.मराठी अध्यायन केंद्राच्या उद्घाटनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज जेएनयू विद्यापीठामध्ये आले होते. मात्र ज्या ठिकाणी हा कार्यक्रम होणार होता, त्याच ठिकाणी विद्यार्थी एकत्र जमले आणि त्यांनी आंदोलनाला सुरुवात केली, या विद्यार्थ्यांचं म्हणणं होतं की सध्या राज्यात मराठी भाषा विरूद्ध हिंदी भाषा असा वाद सुरू झाला आहे, हिंदी भाषिकांवर अन्याय होत आहे. महाराष्ट्रात द्वेषाच राजकारण सुरू आहे, त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जेएनयूमध्ये सत्कार





नको अशी भूमिका या विद्यार्थ्यांची आहे.हे सर्व विद्यार्थी जेएनयूनच्या संमेलन केंद्रासमोर एकत्र आले . फडणवीसांचा सत्कार कशासाठी असा सवाल उपस्थित करत या विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केलं, यावेळी जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आली. जेएनयू विद्यापीठात एसएफआय संघटनेकडून हे आंदोलन करण्यात आलं आहे.

## फडणवीसांनी काय म्हटलं?

दरम्यान मराठी अध्याय केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मराठी भाषेवर सर्व विद्यापीठांमध्ये संशोधन व्हावं यासाठी हे अध्यायन केंद्र आहे. भाषा हे संवादाचं माध्यम आहे, विवादाचं माध्यम कधीच होऊ शकत नाही. मराठी भाषेचा अभिमान हवाच पण त्यासोबत इतरही भाषेचा अभिमान हवा, हिंदीसोबत मराठीचा वादच नाही, मराठी माणूस संकुचित विचार करू शकत नाही. कुठल्याही भारतीय भाषेचा अभिमान वाटला पाहिजे, असं यावेळी बोलताना फडणवीस यांनी म्हटलं आहे.

# श्रावणमासानिमित्त बीडमध्ये संत चरित्र कथा व भक्त विजय कथा महोत्सव

बीड /प्रतिनिधी श्रावणमास म्हणजे भक्तिभावाने ओथंबलेला कालावधी. संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या साडेसातशे व्या जयंतीचे निमित्त या शुभ प्रसंगानिमित्ताने स्वर्गीय झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने संत ज्ञानेश्वर महाराज चरित्र कथा व भक्त विजय कथा संगीतमय या भक्तिपर्वाचे आयोजन करण्यात आले आहे.पाच दिवसीय कार्यक्रम २६ जुलै ते ३० जुलै २०२५ या कालावधीत खटोड प्लाझा, वृंदावन गाडनच्या पुढे, एमआयडीसी रोड, बीड येथे पार पडणार आहे. रोज सकाळी ११ ते सायंकाळी ९ या वेळेत कथा होणार असून, या सोहळ्यात महाराष्ट्र ातील प्रसिद्ध कीर्तनकार कथाकार ह.भ.प. प्रकाश महाराज साठे (केज) तसेच कीर्तनकार कथाकार ह.भ.प. प्रसाद महाराज काष्टे (परभणी) भक्त विजय संगीतमय कथेचे निरूपण करणार आहे. गेल्या वीस वर्षांपासून संत विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी खटोड प्रतिष्ठान सातत्याने कार्यरत आहे. संतांची चरित्रे आणि भक्तांचे प्रेरणादायी जीवन समाजात अध्यात्मिक मूल्यांची जाणीव करून देतात. या उपक्रमाच्या माध्यमातून समाजातील भाविकांनी अध्यात्मिक आनंदाचा लाभ घ्यावा, याकरिता हे आयोजन अत्यंत महत्त्वाचे आहे. पवित्र अशा हिंदू धर्म संस्कृतीच्या श्रावण मास ची सुरुवात झालेली आहे तरी अशा या पवित्र श्रावण मासानिमित्त सर्व बीड शहरातील भाविक भक्तांनी दोन्ही कथेचे श्रवण करावे.सर्व भाविक भक्तांनी या भक्तिरसपूर्ण कार्यक्रमात सहभागी व्हावे आणि अध्यात्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन स्वर्गीय झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# वसंतदादा पाटील महाविद्यालयात लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी

दिनांक २३ जुलै रोजी येथील वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने लोकमान्य टिळकांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य नामदेव चांगण होते तर प्रमुख व्याख्याते प्रा. विठ्ठल शिंदे होते .कार्यक्रमाच्या सुरुवातीस लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्रा शिंदे म्हणाले की, महाराष्ट्रात सर्वप्रथम शिवजयंती उत्सव व गणेश उत्सव सुरू करण्याचे काम लोकमान्य टिळकांनी केले आहे. त्यांचे विचार हे जहाल होते.आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी ब्रिटिश सरकारवर ताशेरे ओढले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य नामदेव चांगण यांनी लोकमान्य टिळकांच्या कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी मंचावर उपप्राचार्य सतीश माउलगे उपस्थित होते. राष्ट्र ीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे यांनी सूत्र संचालन केले तर आभार डॉ लक्ष्मण गाडेकर यांनी मानले. या कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.

# शिवमहापुराण कथेची आज भव्यदिव्य शोभायात्रेने होणार सुरुवात

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पेठ बीड भागातील पौराणिक श्री. रामेश्वर महादेव मंदिर काकू-नाना मळा येथे श्रावणमास निमित्ताने आज शुक्रवार दि. २५ पासून शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले असून आज सकाळी ठिक ११.०० वा. बालाजी मंदिर मोंढा रोड येथून भव्यदिव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. .ही शोभायात्रा पेठ बीड भागातून सवाद्य महादेव मंदिर येथे पोहोचल्यानंतर कथा प्रवक्ते श्री. ज्ञानेश्वर माऊली महाराज थोरात जालनेकर यांच्या अमृतवाणीतून गुरुवार दि.३१ पर्यंत संगीतमय शिवमहापुराण कथेस प्रारंभ होत आहे. या कथेचा प्रारंभ शुक्रवार दि. २५ जुलै ते गुरुवार दि. ३१ जुलै २०२५ दरम्यान दुपारी एक ते चार या वेळेत श्री. ज्ञानेश्वर माऊली थोरात जालनेकर यांच्या अमृतवाणीतून संगीतमय शिवमहापुराण कथा संपन्न होत आहे तसेच कथेची सांगता गुरुवार दि. ३१ जुलै २०२५ रोजी होत असून कथा सांगतेची वेळ दहा ते एक असून शिवमहापुराण कथा ज्ञानयज्ञास परिसरातील महिला, पुरुष भाविकभक्तांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन पंचक्रोशीतील सर्व शिवभक्त, जय श्रीराम गणेश मित्र मंडळ पेठ बीडच्या वतीने करण्यात आले आहे.

संबंधित व्यक्तींवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी, तसेच अपहार केलेला निधी शासनाकडे परत मिळवावा, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

# दारुबंदीसाठी आहेर धानोरा गावातील महिलांचा कलेक्टर कार्यालयावर ठाम पाठपुरावा

बीड । प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील आहेर धानोरा हे गाव धार्मिक, सुसंस्कृत व शांतताप्रिय म्हणून परिचित आहे. गावाच्या सानिध्यात असलेले महर्षी गौतम ऋषी संस्थान हे एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून, या पवित्र भूमीत सध्या सुरु असलेल्या दारुच्या अड्ड्यांमुळे गावाचा सामाजिक आणि आध्यात्मिक रचनेवर गहिरे परिणाम होत आहेत.याच पार्श्वभूमीवर गावच्या सरपंच सौ. मोनिका बालासाहेब इंगोले यांच्या पुढाकाराने



संपूर्ण महिला मंडळ एकवटले आणि आज दिनांक २३ जुलै रोजी कलेक्टर कार्यालयात जाऊन गावात दारुबंदीची मागणी करणारे निवेदन सादर केले.महिलांच्या या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गावात चालू असलेली बेकायदेशीर दारु विक्रीमुळे तरुण पिढी व्यसनाधीन होत आहे. या व्यसनामुळे घरगुती तसेच सामाजिक स्तरावर अनेक समस्या निर्माण होत असून गावचा धार्मिक व संस्कृतिक चेहरा मलिन होत आहे. गावच्या पवित्र भूमीत व्यसनाचे अड्डे असणे ही अत्यंत शरमेची बाब असल्याचे महिला मंडळाने ठामपणे मांडले. सौ. इंगोले यांनी निवेदन दिल्यानंतर माध्यमांशी बोलताना सांगितले,महर्षी गौतम ऋषी यांच्या पवित्र भूमीत अशा अवैध दारु अड्ड्यांना थारा नको. आमचा गाव स्वच्छ, सुसंस्कृत आणि व्यसनमुक्त व्हावा, हीच आमची मागणी आहे. या लढ्यात महिलांनी एकवटून पुढाकार घेतला असून आम्ही शेवटपर्यंत लढा देणार.कलेक्टर साहेबांनी निवेदन स्विकारले असून, लवकरच याबाबत कडक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहे. या सामाजिक लढ्यात गावकऱ्यांनी, विशेषतः महिलांनी दाखवलेली एकजूट ही इतर गावांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# रामनगर ग्रामस्थांकडून बळीराम गवते, बळीराम मोहिते यांचा नागरी सत्कार



बीड दि.24 :राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवक जिल्हाध्यक्षपदी बळीरामअप्पा गवते यांची नुकतीच निवड झाली. तसेच रामनगरचे भूमिपुत्र बळीराम मोहिते यांची बीड नगरपरिषदेत सहायक नगर रचनाकारपदी नियुक्ती झाली. या दोन्ही यशस्वी व्यक्तिमत्त्वांचा नागरी गौरव गुरुवारी (दि.24) रामनगर ग्रामस्थांच्यावतीने मोठ्या उत्साहात वाजतगाजत सत्कार करून करण्यात आला.

ग्रामस्थांच्या उपस्थितीत रामनगर येथे पार पडलेल्या या सत्कार समारंभात सरपंच सर्जेराव मोहिते, फारूक शेख, पत्रकार केशव कदम, अशोक सुरवसे, रामभाऊ मोहिते, निलेश मोहिते, यशवंत मोहिते, कृष्णा मोहिते, रुपेश खरसाडे, रामनाथ चव्हाण, त्र्यंबक चव्हाण, हनुमान मोहिते, विश्वंभर ढेरे, सचिन मोहिते, मुकेश ढेरे, लक्ष्मण आवारे, राहुल ढेरे, केतन सजगने, सावन ढेरे, महादेव मोहिते, सुनील कदम, बाळासाहेब चोरमले आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान ग्रामस्थांनी फटाक्यांच्या आतषबाजीत व ढोलताशांच्या गजरात स्वागत करत अभिनंदनाचा वर्षाव केला. दोन्ही मान्यवरांनी ग्रामस्थांचे आभार मानत सामाजिक कार्य आणि विकासाभिमुख धोरण राबवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला.

# श्री संत सावता महाराज यांच्या दिंडी सोहळ्याने परळी नगरी दुमदुमली दिंडीतील कलशधारी महिला, पताका आणि टाळ मृदंग ठरले आकर्षण



पुण्यतिथीनिमित्त परळी येथील श्री संत सावता महाराज यांच्या मंदिरातून निघालेल्या दिंडी सोहळ्याने अक्षरशः परळी शहर दुमदुमून गेले होते. दरम्यान दिंडी सोहळ्यातील मोठ्या उत्साहाने सहभागी झालेल्या कलशधारी महिला, झेंडे पताका आणि टाळ मृदग धारक वारकरी आकर्षक ठरले आहे.वारकरी संप्रदायाचा आराध्य दैवत असलेल्या पांडु रंगाच्या दर्शनासाठी राज्यासह देशभरातील विविध देवदेवतांच्या दिंड्या आषाढीला श्रीक्षेत्र पंढरपूर येथे जातात परंतु एकमेव संत श्री सावता महाराज मात्र पंढरपूरला न जाता आपल्या मळ्यातच पांडुरंगाचे नामस्मरण करत असतात अशा पांडुरंगाच्या भक्तीमध्ये लिहिणे झालेल्या संतश्रेष्ठ सावता महाराज यांच्या भेटीसाठी वाटतं स्वतः पांडुरंग सावता महाराजांच्या मळ्यामध्ये भेट देतात म्हणजेच पांडुरंगाची दिंडी श्री क्षेत्र आरण येथे जाते असा आघात महिमा असलेल्या संत शिरोमणी सावता महाराज यांची आज पुण्यतिथी यानिमित्त येथील सावता महाराज मंदिरात मागील सात दिवसापासून सुरू असलेल्या सप्ताह निमित्त आज दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते दुपारी १२:३० वाजता प्रारंभ झालेल्या दिंडी सोहळा गणेश पार मार्गे नांदूर वेश, आंबेवेश मार्गे वैद्यनाथ मंदिर जगमित्र संत सोपान काका मंदिर पुढे नेहरू चौक टावर मार्केट कमिटी आर्य समाज पद्मावती मार्गे दिंडी सोहळा गोपाल कृष्ण चित्रमंदिर कडू न संत सावता महाराज यांच्या मंदिरामध्ये संपन्न झाला. या दिंडी सोहळ्यात कलशधरी महिला, टाळमृतांगाचा निनाद आणि मोठ्या दिमाखात डौलणारे झेंडा पताका सर्वांचे आकर्षण ठरले होते. दरम्यान ज्ञानोबा तुकाराम आणि टाळंबरांच्या निनादाने अक्षरशः परळी नगरी दुमदूमून गेली होती. विशेष म्हणजे या संपूर्ण दिंडी सोहळ्याच्या मार्गावर भाविकांनी सडा रांगोळी टाकून दिंडी सोहळ्याचे जागोजागी मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले आहे. सायंकाळी सहा वाजल्यानंतर श्री संत सावता महाराज मंदिरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. एकंदरीतच आजच्या हिंदीसोळ्या समाज बांधवांसह पंचक्रोशीतील हजारो भाविक या दिंडी सोहळ्यात सहभागी झाले होते. विशेष म्हणजे कोणताही अनुचित प्रकार न घडता हा दिंडी सोहळा अतिशय उत्साहात संपन्न झाला.

संपादकीय

## माय लॉर्ड, विश्वास ढळतोय ...!

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या सलामीलाच उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी तत्काळ प्रभावानेफ राजीनामा देऊन खळबळ उडवून दिली आहे. पहलगाम हल्ला, ऑपरेशन सिंदूर, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्र म्प यांची संघर्षविरामाबाबतची वक्तव्ये आणि बिहार मतदारयादी पडताळणी अशा विषयांवरून सत्ताधारी–विरोधक शस्त्रे परजत असतानाच धनखड यांच्या राजीनाम्याने राजकारणास अनपेक्षित कलाटणी दिली आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे राजीनामा देत असल्याचे धनखड यांनी म्हटले असले, तरी या प्रकरणात पडद्यामागे नेमके काय घडले, याबाबत अनेक तर्कवितर्क लढविण्यात येत आहेत. ‌ङ्गमाझा कार्यकाळ २०२७ पर्यंत आहे आणि दैवी हस्तक्षेप वगळता मी तो पूर्ण करीन,फ असा निर्धार त्यांनी पंधरवड्यापूर्वीच व्यक्त केला होता. त्यामुळे आता असा कुठला दैवी हस्तक्षेपफ झाला का, असा प्रश्न विचारला जाणे आलेच. सत्तेच्या अतिवरिष्ठ वतु ळात सारे काही आलबेल नसल्याचे चित्र या राजीनामा प्रकरणातून निर्माण होते. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्यसभेचे कामकाज चालविणारे धनखड आणि सत्ताधारी वर्तुळ यांच्यात उडालेले खटके नजरेतून सुटणारे नव्हते. दिल्ली उच्च न्यायालयाचे न्या. यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी सापडलेल्या नोटांप्रकरणी त्यांच्यावर महाभियोग चालविण्याचा मुद्दा सोमवारी चर्चेत आला. लोकसभेमध्ये सत्ताधाऱ्यांनी १५२ सदस्यांच्या सह्यांसह तसा प्रस्ताव सादर केला; राज्यसभेत मात्र विरोधी गोटातील ६३ सदस्यांनी चपळाई करून वेगळा प्रस्ताव आणला. नियमानुसार पन्नासहून अधिक सदस्यांचा आणि प्रथम सादर होणारा प्रस्ताव दाखल करण्याचे सूतोवाच धनखड यांनी केल्याने सत्ताधारी दोन पावले मागे राहिल्याचे चित्र निर्माण झाले. असे करून धनखड यांनी नेतृत्वाची खप्पामर्जी ओढवून घेतल्याचे त्यातून दिसून आले. याची प्रचिती राज्यसभेचे नेते आणि भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या कृतीतून आली. काँग्र ेसचे अध्यक्ष मल्लिकाजु र्न खर्गे यांना सभागृहात ऑपरेशन सिंदूरफच्या मुद्द्यावरून सरकारला धारेवर धरण्यासाठी अधिक वेळ मिळाल्याने अस्वस्थ झालेले नड्डा यांनी, विरोधकांचे म्हणणे नोंदविले जाणार नाही, फक्त माझेच म्हणणे रेकॉर्ड होईल, असे बजावले. कोणत्या नोंदी पटलावर घ्यायच्या, याबाबतच्या पीठासीन अधिकाऱ्याच्या अधिकारांचे ते उल्लंघन, पर्यायाने पदाचा अवमान मानला गेला. त्यानंतर धनखड यांच्या उपस्थितीत महाभियोगाच्या विषयावर चर्चा अपेक्षित असलेल्या बैठकीस नड्डा आणि मंत्री किरण रिजिजू यांनी मारलेली दांडी, ही कदाचित उंटाच्या पाठीवरची शेवटची काडी ठरली. सभागृहाच्या कामकाज सल्लागार समितीच्या या बैठकीपेक्षा संसदीय कार्यमंत्र्यांसाठी अधिक महत्त्वाचे काम कोणते असू शकते, या प्रश्नात तथ्य असल्याने मंत्र्यांच्या या कृतीत सभापतींचा उपमर्द दिसून आला. दुपारी नेमके काय घडले,फ असा विरोधकांचा सवाल असून, या वेळेत एका अतिवरिष्ठ नेत्याशी महाभियोगाच्या मुद्द्यावरून खटके उडाल्याचे; तसेच त्यातून राज्यसभेतील भरतीच्या विषयाकडेही अप्रत्यक्षपणे बोट दाखविण्यात आल्याचे सांगण्यात येते. घटनात्मकदृष्ट्या देशातील दुसऱ्या क्रमांकाच्या पदावरून मुदतीपूर्वी राजीनामा देणारे धनखड हे तिसरे उपराष्ट्रपती. मूळचे राजस्थानचे जाट समाजाचे नेते धनखड हे स्पष्टवक्तेपणासाठी प्रसिद्ध असून, त्यामुळेच त्यांच्या विधानांमधून अनेक वादही ओढवले आहेत. पश्चिम बंगालमध्ये राज्यपाल असताना मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या सरकारशी त्यांचा अनेकदा संघर्ष झाला. उपराष्ट्रपतिपदावर आल्यावरही राज्यसभेचे कामकाज चालविताना विरोधकांनी त्यांच्यावर अनेक आरोप करून त्यांच्या विरोधात महाभियोग आणण्याचा प्रयत्न केला होता

# बीडचे एसपी नवनीत कॉवत यांची तात्काळ बदली करावी- अँड.गणेश कोल्हे

### एसपी साहेब बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला कायदेविषयक जनजागृती करण्यास मग्न


गेवराई(प्रतिनिधी) बीड जिल्ह्यात पोलीस अधीक्षक बीड श्री.नवनीत कॉवत यांनी पोलीस अधीक्षक पदाचा कारभार हाती घेतल्यानंतर त्यांच्याकडून संबंधित बीड जिल्ह्याला खूप अपेक्षित होते की एक नवतरुण आयपीएस अधिकारी आपल्या जिल्ह्याला मिळालेला आहे व त्या दररोज नित्यनेमाने जिल्ह्यातील संघटित गुन्हेगारी व बीड जिल्ह्यात राजरोज चालणारी मोठ्या मोठ्या अवैध धंदे यावर कारवाई होईल या अपेक्षेने श्री.नवनीत कॉवत व त्यांच्याकडे संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष्य केंद्रित होते परंतु बीड जिल्ह्यामध्ये केज तालुक्यात मसाजोग येथील संतोष देशमुख यांच्या हत्या झाली राहिलेल्या आरोपीस शोधण्यात हे त्यांचे पहिले अपयश असून त्यानंतरच्या गुन्ह्यामध्ये आरोपी न सापडणे याची मालिका दिवसेंदिवस सुरूच राहिली आहे व या हत्येचे खापर तत्कालीन बीडचे पोलीस अधीक्षक श्री. अविनाश बारगळ यांची उचल बांगडी करण्यात आली व त्यांच्या जागी नवनियुक्त पोलीस अधीक्षक म्हणून श्री.नवनीत कॉवत यांना पदभार देण्यात आला नवनिर्वाचित एसपी या पदावर कार्य करत असताना काम त्यांच्याकडून अपेक्षाप्रमाणे होईल असे वाटत असताना मात्र जिल्ह्यातील गुन्हेगार हे प्रतिबंध करतील अशी अपेक्षा होती परंतु श्री.नवनीत कॉवत आल्यापासून व पदभार घेतल्यापासून त्यांच्याकडून एकही नविन किंवा पूर्वीच्या गुन्ह्यातील संघटित गुन्हेगारी यांना कुठेही लगाम लागलेला दिसूनही आला नाही उलट श्री नवनीत कॉवत हे कर्मचारी यांच्या बदल्यांच्या प्रकरणात बदनाम झालेले निदर्शनात आले आहेत श्री. नवनीत कॉवत हे स्वतःला मीडियासमोर सिंघम ठरवण्याचा प्रयत्न करत आहेत परंतु त्यांनी मीडियासमोर सिंघम बनण्यापेक्षा बीड जिल्ह्यातील चार्ज घेतल्यापासून संघटित गुन्हेगारी रोखण्यास अयशस्वी ठरले आहेत त्यामुळे श्री.नवनीत कॉवत यांनी सध्या चालू असलेल्या संतोष देशमुख व त्यानंतर महादेव मुंडे यांच्या पत्नीला एसपी कार्यालयाच्या परिसरात विष प्राशन करण्यास नाविलाज झाला तरीसुद्धा आरोपीविरुद्ध या प्रकरणात सखोल अभ्यास करून त्यातील आरोपी डिटेक्ट करून जेलमध्ये टाकण्यास प्राधान्य द्यायला पाहिजे होते तसे न करता श्री. नवनीत कॉवत हे कर्तव्यावर आल्यापासून बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला कायदेविषयक जनजागृती करण्यास मग्न असल्याचे पाहायला मिळतेय त्यांनी कायदेशीर जनजागृती करण्याबरोबरच गुन्हेगाराला देखील गुन्हेगारी थांबवण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे ते न करता कायद्याचे प्रशिक्षण व माहिती देण्यात प्रत्येक विभागात व्यस्त आहेत त्यामुळे श्री. नवनीत कॉवत हे बीड जिल्ह्यातील संघटित गुन्हेगारी व दररोज घडणारे महिलेवरील अत्याचार व अन्याय व अत्यंत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल होत आहे ते दाखल होऊ नये यासाठी श्री नवनीत कॉवत हे अपयशी ठरलेले आहेत त्यामुळे त्यांची बीड जिल्ह्यातून बदली होणे अत्यंत गरजेचे आहे. जर श्री.नवनीत कॉवत यांची बीड जिल्ह्यातून तात्काळ बदली झाली नाही तर भविष्यात गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडणारच याला नवल वाटायला नको म्हणून श्री. नवनीत कॉवत हे या जिल्ह्यांमध्ये पोलीस अधीक्षक या पदावर पहिल्यांदाच विराजमान झाले असल्याने त्यांना जिल्ह्याचा प्रभारी अधिकारी म्हणून व कायदा व सुव्यवस्थेचा अनुभव नसल्याचेही स्पष्ट झाले आहे त्यामुळे बीड जिल्ह्याला एक अनुभवी व खमक्या व गुन्हेगारांचा गर्दन का असणारा आयपीएस अधिकारी असणे भविष्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असुन त्यामुळे श्री नवनीत कॉवत यांची तात्काळ बदली करावी याबाबत मुख्यमंत्री तथा राज्याचे गृहमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस साहेब यांच्याकडे तक्रार करणार असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे अँड.गणेश कोल्हे यांनी दिली आहे

### पुरवठा विभागात कुठेतरी लिकेज होतंय! पुरवठा विभागाला लागल्या घुशी ; माल होतोय गायब ?

# सर्वसामान्य जनतेला मिळणारा गहू तांदूळ गायब होतोय ?

## पुरवठा अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी जनतेच्या तक्रारी पत्रकारांकडे येऊ लागल्या!



पाटोदा | प्रतिनिधी पाटोदा तालुक्यातील अनेक गावाच्या तक्रारी पत्रकारांकडे आल्या आहेत. पुरवठा विभागात लिकेज आहे. पुरवठा अधिकाऱ्यांनी ते लिकेज तात्काळ बंद करून जनतेचा हक्काचा माल त्यांना द्यावा अशी वागणी पत्रकारांनी केली आहे अन्यथा.. जे लिकेज आहे ते पण दाखवले जाईल तसेच पुरवठा विभागात घुशी शिरल्याच सुद्धा बोलले जात आहे. काही बंदोबस्त करण्यात यावा असा इशारा पत्रकारांनी दिला आहे. सर्वसामान्य जनतेचा हक्काचा माल गहू तांदूळ याव्यतिरिक्त शासनाकडून मिळणार जे धान्य आहे ते जात्या हक्काच्या गरजूवंतांना मिळालं पाहिजे परंतु पुरवठा विभागात कुठेतरी लिकेज असल्याचं समोर येत आहे. पुढारी पुढे यायला तयार नाहीत मग जनतेने डायरेक्ट पत्रकारांची भेट घेतली आणि प्रश्न सोडवण्यासाठी हाक दिली आहे. आता पत्रकारांनी लेखणीतून संबंधित विभागाला सूचना इशारा दिला आहे ची दखल संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी घ्यावी अन्यथा ते लिकेज पत्रकारच बंद करतील आणि सर्वसामान्य जनतेचा थकलेला थकवलेला हक्काचा शासनाकडून मिळणारा माल तात्काळ त्यांना द्यावा अन्यथा पुढील पत्रकारांच्या लेखणीला अधिकाऱ्यांनी सामोरे जावे हा इशारा देण्यात आला आहे... अधिकाऱ्यांनी त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्यांनी जनतेची फसवणूक करू नये दिशाभूल करू नये चांगलं काम करणाराला त्रासही देऊ नये अन्यथा पत्रकार लेखणीतून सगळं उघड करतील हे लिकेज करणाऱ्यांनी लक्षात ठेवावं तसेच पुरवठा विभागात घुशी सरल्याचं कानावर येत आहे. त्यादेखील घुशी बाहेर काढाव्यात असेही आव्हान करण्यात आले आहे.

### अधिकाऱ्यांनी कोणाच्या इशाऱ्यावर काम करू नये

अधिकारी येतात जातात नेते येतात जातात जनता आहे तिथेच आहे त्यामुळे अधिकाऱ्यांनी कोणत्याही नेत्यांच्या इशाऱ्यावर काम करू नये तसेच जनतेच हक्काचा त्यांना देण्यासाठी प्रयत्न करावेत आणि आपलं कर्तव्य पार पाडावे अन्यथा पत्रकार लेखणीतून तुमचं कर्तव्य दाखवून देतील यात शंका नाही..

### पुरवठा विभागाचे लिकेज बंद करा

पुरवठा विभागात लिकेज असल्याचे पुरावे आहेत. संबंधित अधिकाऱ्यांशी ही चर्चा केली आहे. त्यांनी थकलेला माल तात्काळ त्यांचा द्यावा तसेच पुढील माल व्यवस्थित त्यांना पोहोच होईल याची दक्षता घ्यावी.. अन्यथा पत्रकार लेखणीतून पुरवठा विभागाचा लिकेज बंद करतील याची नोंद घ्यावी...

### पाचसहा महिन्यापासूनचा माल तात्काळ त्यांना द्या

अनेक ठिकाणच्या तक्रारी आल्या असून पुरवठा विभागाकडून मिळणारा माल जनतेपर्यंत पोहोचला नाही उलट अधिकाऱ्यांकडूनच बोललं जात आहे तुमचा माल पोहोच झाला आहे गाव लेवललाच भांडण लावून देण्याचं काम अधिकारी करत असल्याचा दिसून येत आहे. हे वरिष्ठ लेवल वरून तात्काळ थांबवावं अन्यथा परिणाम वेगळे होतील यात शंका नाही..

# युरीया खताची साठेबाजी करुन दुप्पट दराने विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांची होणार चौकशी


## शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होऊ देणार नाही – सभापती गजानन मुंडे

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : युरीया खतांची कृत्रीम टंचाई करुन जादा दराने विक्री चालू असल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे यांनी तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत निमोड यांच्याशी संपर्क साधून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होणार नाही आणि शेतकऱ्यांना युरीयासह अन्य मिश्र खताचा गरजेनुसार पुरवठा होण्याच्या दृष्टीने संवाद साधला आहे.कृषी अधिकाऱ्यांनी तात्काळ चौकशीसाठी लवकरच पाऊल उचलणार असल्याचे आश्वाशीत केले.रासायनिक खतांची केलेली कृत्रीम टंचाई शेतकऱ्यांसाठी अतिशय घातक ठरणारी आहे. आज युरीया खताची आवश्यकता असतांना साठेबाजी करून दुप्पट दराने विक्री करून आडवलेल्या शेतकऱ्यांच्या खिशाला कात्री लावल्या जात आहे.किनवट तालुका कृषी अधिकारी कार्यालयाची सुत्रे चंद्रकांत निमोड यांच्याकडे आहेत. सद्या खरीप हंगाम चालू आहे. मध्यंतरी पावसाने दडी मारल्याने खताचा दुसरा हप्ता राहिलेला होता. गेल्या तीन दिवसापासून पावसाची सुरुवात झाल्याने शेतकऱ्यांनी कृषी केंद्रावर धाव घेतली. युरीया खताची मागणी वाढली आहे. शेतकऱ्यांचा अंदाज घेत कृषी सेवा केंद्रचालकांनी खताची साठेबाजी करन वृत्रीम टंचाई निर्माण केली आहे. शेतकऱ्यांची ऐनवेळी अशी अडवणूक केली जात असेल तर कृषी विभागानेही सजग राहून शेतकऱ्यांना एमआरपी प्रमाणेच खताचा पुरवठा करण्याच्या दृष्टीने सूचित केले आहे. शेतकऱ्यांनीही जास्त दराने खत खरेदी न करता कोणता व्यापारी अडवणूक करीत असेल तर त्या शेतकऱ्यांनी किनवट कृषी विभागाकडे तक्रार करण्याचे आवाहन सभापती मुंडे यांनी केले आहे. शेतकरीही व्यापाऱ्यांच्या विरोधात तक्रार करण्यास धजावत नाही. कारण नेहमीच संबंध असतात. कधी कधी थोडीफार उदारी मागण्याचा प्रसंग येतो कारण प्रत्येक वेळी पैसे असतातच असे नसते. त्याच संधीचा फायदा कदाचित व्यापारी उचलतात असा अनुमान लावला जात आहे. कृषी अधिकाऱ्यांनीही शेतकऱ्यांच्या लेखी तक्रारीची वाट न पहाता तोंडी तक्रारीचीही दखल घ्यावी लागणार आहे, कृषी सेवा केंद्राच्या फलकावर दैनंदीन विक्री आणि शिल्लक, भाव लिहिलेला नसतो. लिहीणे बंधनकारक असतांनाही त्याचे पालन केले जात नसल्याचे कांही दुकानांवर जाऊन खात्री केल्यानंतर तो प्रकार समोर आलाय. ग्रामिण भागातील कांही व्यापाऱ्यांनी युरीया चारशे रुपये दराने सर्रास विक्री चालवती असल्याच्या तक्रारी आहेत. माणूस पाहून खताची विक्री चालते. कृषी विभागाने व्यापाऱ्यांना सूचना देऊन साठेबाजी खुली करावी. योग्य किंमतीतच खत विक्री करण्याच्या सक्त सूचना द्याव्यात. तडकाफडकी भूमिका न बजावल्यास शेतकऱ्यांची आर्थिक लूट अटळ आहे. पाहूया सभापती मुडेंच्या सूचनांची कृषी विभाग किती दखल घेणार.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २५ जुले २०२५
https://lokaarambh.com



## पाटोदा ग्रामीण रुग्णालयासमोर एसटी बसच्या धडकेत भीषण अपघात पती-पत्नी ठार





पाटोदा (प्रतिनिधी) पाटोदा ग्रामीण रुग्णालयासमोर आज सकाळी एक भीषण अपघात घडला. एसटी बसच्या जोरदार धडकेत दुचाकीस्वार पती-पत्नी जागीच ठार झाले आहेत. या दुर्दैवी अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे बाळू केशव वायकर आणि त्यांची पत्नी लता बाळू वायकर, रा. घाटेवाडी, ता. पाटोदा, जिल्हा बीड अशी आहेत. दुचाकीवरून जात असताना रुग्णालयासमोर एसटी बसने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून नागरिकांनी मदतीसाठी पुढाकार घेतला.पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह पाटोदा ग्रामीण रुग्णालयात हलवले असून अपघाताबाबत पुढील तपास सुरू आहे. जखमी. रामदास ढवळे राहणार ढाळेवाडी तालुका पाटोदा जिल्हा बीड. मयत. बाळू केशव वायकर. लता बाळू वायकर. राहणार घाटेवाडी तालुका पाटोदा जिल्हा बीड.

## लिंबागणेश येथे राज्यव्यापी चक्काजाम आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद– डॉ. गणेश ढवळे

लिंबागणेश : (दि.२४) माजी राज्यमंत्री तथा प्रहार जनशक्ती पक्ष चे संस्थापक अध्यक्ष श्री. ओमप्रकाश (बच्चू) कडु यांनी मांडलेल्या शेतकरी कर्जमाफी, शेतीमालाला हमीभावावर २० टक्के प्रोत्साहन बोनस, कामगार, दिव्यांग व विधवा महिलांना मासिक ६००० रुपये मानधन, तसेच रोजगार, शिक्षण व आरोग्य या मूलभूत मुद्द्यांवर तातडीने निर्णय घ्यावेत या मागण्यांसाठी पुकारलेल्या राज्यव्यापी “चक्का जाम” आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी लिंबागणेश येथेही आंदोलन करण्यात आले. आज गुरुवार, दि.२४ रोजी सकाळी अहमदपूर–अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू झाले. यावेळी सरकारविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. या आंदोलनात सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ, शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांची समायोजित भाषणे झाली. यावेळी नेकनूर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. लिंबागणेश पोलिस चौकीचे सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख, पो.शि. बाबासाहेब खाडे, विशाल कदम,



पो.हे. अनिल राऊत हे देखील उपस्थित होते. आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ आप्पा गिरे, बाळकृष्ण थोरात, विक्रांत वाणी, सुरेश निर्मळ, संजय घोलप, अभिजित गायकवाड, सय्यद अख्तर, दादा गायकवाड, अंकुश वाणी, भगवान मोरे,



भालचंद्र गिरे, तुळशीराम वनवे, गणपत घोलप, प्रकाश ढवळे, धनंजय बागल, दादाराव घाडगे, विशाल वाणी , प्रकाश निर्मळ,संदिप निर्मळ,अजय थोरात आदींचा उत्स्फूर्त सहभाग होता.

? डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर

# खा.सोनवणेंकडून महामार्ग, रेल्वेसाठी सतत पाठपुरावा; केंद्रीय मंत्र्यांची भेट घेवून मांडले प्रश्न

**पाठपुराव्यातील चिकाटी पाहून केंद्रीय मंत्री गडकरींनी थोपटली पाठ, रेल्वेमंत्री वैष्णव यांच्याकडून मागण्यासंदर्भात सकारात्मकता**



बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महामार्ग, रेल्वेचे कामे होणे अत्यंत महत्त्वाचे असून, केंद्रीय मंत्री गडकरीसाहेब यांनी वैयक्तिक लक्ष देतो, असा शब्द दिला आहे. तर रेल्वेमंत्र्यांनी मागण्यासंदर्भात सकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे. या प्रकल्पांची अंमलबजावणी लवकरात लवकर होण्यासाठी माझ्याकडून सातत्याने पाठपुरावा केला जाईल.

**- खा.बजरंग सोनवणे, बीड मतदारसंघ.**

बीड जिल्ह्यातील विविध राष्ट्रीय महामार्गाचे काम तातडीने पुर्ण करावेत, महामार्ग कामे करीत असताना जिथे-जिथे तांत्रिक दोष झालेले आहेत ते दुरुस्त करावेत, भेगा पडलेल्या महामार्गांची दुरूस्ती करावी, अशा विविध मागण्यांसाठी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची दिल्लीत भेट घेतली. यावेळी सततचा पाठपुरावा पाहून मंत्री नितीन गडकरी यांनी पाठ थोपटली. तर जिल्ह्यातील रेल्वेच्या संदर्भात केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेवून रेल्वे संदर्भातील विषयावर चर्चा केली. यावेळी मंत्री वैष्णव यांनी रेल्वेसंदर्भाने मांडलेल्या सर्व मागण्यांबाबत सकारात्कता दर्शवली. दि.२४ जुलै रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या कार्यालयात त्यांची भेट घेतली. यावेळी शेगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग मधील परतूर-माजलगाव बिटमधील सादोळा (ता.माजलगाव) येथील अपूर्ण असलेली सर्व कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली. माजलगाव-केज बिटमधील नादुरुस्त भागांची दुरुस्ती व तांत्रिक दोष दूर करण्याबाबत निर्देश द्यावेत, धारूर घाटातील प्रस्तावित वळण मार्गाचे काम तसेच बर्दापूर-लोखंडीसावरगाव चौपदरीकरणाचे काम लवकरात लवकर सुरू करावे, केज-कळंब मधील मांजरा नदीवरील पुलाच्या कामासंदर्भात निर्माण झालेल्या अडचणी दूर करून काम पूर्ण करावे, पैठण-पंढरपूर रस्ता व अहमदपूर-मांजरसुंबा-पाटोदा या रस्त्यांवरील समस्या तातडीने सोडवाव्यातव प्रस्तावित अतिरिक्त बाबींना मंजुरी देण्यात यावी. छत्रपती संभाजीनगर—बीड—सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील गेवराई तालुक्यातील गढी येथील उड्डानपुल व रस्ता हा विभागाच्या तांत्रिक दोषामुळे अपघात होऊन ६ युवकांचा दुर्दैवी मृत्यू ओढवला. या तांत्रिक दोषाची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. मयतांच्या कुटूंबियांना मदत करण्यात यावी, अशी आग्रही मागणी केली. या सर्व मुद्द्यांकडे ना.गडकरी यांनी वैयक्तिक लक्ष घालण्याचे आश्वासन दिले व उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी संबंधितांना सूचना दिल्या. याच वेळी ‘तुमचा बीड जिल्ह्याच्या विकासासाठीचा पाठपुरावा आणि धडपड चांगली आहे’, अशा शब्दात पाठीवर थाप देवून कौतूक केले. यानंतर रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची त्यांच्या संसदभवन कार्यालयामधे खा.सोनवणे यांनी भेट घेतली. यावेळी, आहिल्यानगर-बीड—परळी रेल्वे प्रकल्पाअंतर्गत प्रस्तावित १० रोड ओव्हर ब्रिज व ढोलेवस्ती (बीड) रोड अंडरपासचे काम त्वरीत सुरु करण्यात यावे. बार्शीनाका (बीड शहर) रेल्वे स्टेशनवर प्रवासी संख्येच्या प्राथमिकतेच्या आधारे थांबा देण्यास मंजुरी देणे, अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर रेल्वे स्टेशनवर रेल्वेगाड्यांना थांबा देण्याचा प्रस्ताव मंजूर करून आदेश त्वरित निर्गमित करणे, बीड-आहिल्यानगर-सीएसटी (मुंबई) अशी नियमीत रेल्वेसेवा लवकर सुरू करावी, अशी मागणी केली. यावेळी मंत्री वैष्णव यांनी सकारात्मकता दाखवित मागण्यांसदर्भात कार्यवाही करण्याचा शब्द दिला.

## सादोळाकरांची माणगी केंद्रीय मंत्र्यांपुढे मांडली

शेगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गमधील परतूर-माजलगाव बिटमधील सादोळा (ता. माजलगाव) येथे पुल आणि रस्त्याचे काम अपुर्ण आहे. याठिकाणी जमीनीवरूनही वादविवाद निर्माण झालेले आहेत. यामुळे काम अपूर्ण असून यावर योग्य तो मार्ग काढून तेथील काम पूर्ण करावे, यासाठी मागील काही दिवसांपुर्वी सादोळाकरांनी उपोषण केले होते. यानंतर दि.२४ जुलै रोजी खा.सोनवणे यांनी सादोळाकरांचा प्रश्न थेट केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यापुढे ठेवला. रस्त्यासंदर्भात जनभावना लक्षात घेवून तो प्रश्न तातडीने सोडवू, असे मंत्री गडकरी म्हणाले.

## केजमध्ये महिला हरिपाठ स्पर्धेच्या भव्य आयोजनासाठी नियोजन बैठक संपन्न



केज (जिल्हा बीड) – “संत जनाई, मुक्ताई, बहिणाबाई महिला हरिपाठ मंडळाच्या” भव्य स्पर्धा सोहळ्याच्या नियोजनाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण बैठक बीड जिल्ह्यातील केज येथे संपन्न झाली. या बैठकीचे आयोजन वारकरी साहित्य परिषद महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष ह.भ.प. विठ्ठल (काकाजी) पाटील यांच्या सूचनेनुसार आणि वैकुंठवासी सौ. मालुश्रीताई विठ्ठल (काकाजी) पाटील यांच्या संकल्पनेतून करण्यात आले होते. या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी रामेश्वर महाराज धपाटे यांनी पुढाकार घेतला असून, ते या कार्यक्रमाचे प्रमुख समन्वयक म्हणून कार्य करत आहेत. बैठकीस बीड जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील वारकरी मंडळांचे प्रतिनिधी, महिला हरिपाठ मंडळांच्या प्रमुख, आयोजक मंडळाचे सदस्य, तसेच वारकरी परंपरेशी जोडलेले अनेक मान्यवर उपस्थित होते. महिलांच्या सहभागातून भक्तीचा प्रसार आणि वारकरी संस्कृतीचा विकास हे या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे, यावर सर्वानुमते एकमत झाले. या बैठकीत स्पर्धेचे स्वरूप, नियमावली, सहभाग घेणाऱ्या मंडळांची नोंदणी प्रक्रिया, स्पर्धेची ठिकाणे आणि वेळापत्रक, परीक्षकांची निवड तसेच पारितोषिके याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः ग्रामीण भागातील महिला हरिपाठ मंडळांना मोठ्या संख्येने सहभागी करून घेण्यासाठी जनजागृती मोहिमा राबवण्याबाबत ठरवण्यात आले. स्पर्धेच्या माध्यमातून महिलांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्यातील अध्यात्मिक शक्तीला चालना देणे आणि संत साहित्याची गोडी निर्माण करणे, हे कार्यक्रमाचे प्रमुख हेतू आहेत. बैठकीत असेही ठरवण्यात आले की, स्पर्धेपूर्वी जिल्हास्तरावर कार्यशाळा, हरिपाठ गायन प्रशिक्षण आणि संत विचार प्रचार उपक्रमही राबवण्यात येतील. कार्यक्रमात पारंपरिक पोशाख, संतचरित्र सादरीकरण, हरिपाठ गायन शैली यावरही विशेष भर दिला जाणार आहे. रामेश्वर महाराज धपाटे यांनी उपस्थित सर्वांना मार्गदर्शन करताना सांगितले की, “आजच्या महिलांमध्ये दडलेली अध्यात्मिक ऊर्जा हरिपाठाच्या माध्यमातून व्यक्त व्हावी यासाठी हा उपक्रम अत्यंत आवश्यक आहे. या माध्यमातून संत परंपरेचा वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचेल.” कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या असून, प्रचार प्रसार, नोंदणी, व्यवस्थापन, सांस्कृतिक आयोजन व स्वयंपाक आदी बाबींचे विभागीय नियोजन करण्यात आले आहे. संपूर्ण बीड जिल्ह्यात या स्पर्धेचा उत्साह असून, महिलांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी

## जामीन मिळताच आरोपीने फिर्यादीला पुन्हा केली मारहाण; फिर्यादीची पोलीस अधीक्षकांकडे धाव! फिर्यादी लियाकत बेग यांना पुन्हा मारहाण

बीड (प्रतिनिधी) - शहरातील गांधीनगर भागात राहणारे मिर्झा लियाकत सज्जन बेग यांना आरोपी बाबा खाजा शेख, आयेशा बाबा शेख, शेख शहेनाज अब्दुल शेख (गिड्डी), शेख हिना यांनी दोन महिन्यांपूर्वी मारहाण केली होती. त्यानंतर लियाकत बेग यांनी या मारहाण प्रकरणी पेठ बीड पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली असता मारहाण करणाऱ्या आरोपींवर दिनांक 24 मे 2025 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. यामुळे मारहाण करणाऱ्या तिन्ही आरोपींना पोलिसांकडून अटक करण्यात आली होती. नंतर त्यांची जामीनावर मुक्तता झाली. जामीन मिळताच या सर्व आरोपींनी पुन्हा लियाकत बेग यांच्या घरी जाऊन अर्वाच्च शिवीगाळ करत मारहाण केली व पुन्हा एकदा जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. यामुळे मिर्झा लियाकत बेग यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे धाव घेऊन रीतसर तक्रार देत आरोपींकडून जीवितास धोका असल्याचे म्हटले आहे तसेच सर्व आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी अशी मागणी केली आहे. याविषयी जिल्हा पोलिस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात लियाकत बेग यांनी नमूद केले आहे की, आरोपी बाबा खाजा शेख, आयेशा बाबा शेख, शेख शहेनाज अब्दुल गफ्फार, अब्दुल जाफर शेख व शेख हिना सर्व राहणार गांधीनगर. हे सर्वजण आरोपी असून गुंड प्रवृत्तीचे आहेत. यापूर्वीही यांच्या विरोधात विविध पोलीस ठाण्यामध्ये अनेक स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. या सर्वांनी मिळून यापूर्वी लियाकत बेग यांना दोन महिन्यांपूर्वी मारहाण केली होती. तसेच जीवे मारण्याची धमकी सुद्धा दिली होती. या सर्व आरोपीतांकडे तलवार, कुकरी सारखे प्राण विघातक शस्त्र आहेत. आणि हे सर्वजण या शस्त्रां चा धाक दाखवून वेळप्रसंगी त्याचा समोरच्या व्यक्तींवर वापर करून प्राणघातक हल्ले करतात. अशाच पद्धतीने त्यांनी यापूर्वी 24 मे 2025 रोजी सुद्धा लियाकत बेग यांच्यावर प्राणघातक हल्ला केला होता. त्यानंतर लियाकत बेग यांनी पेठ बीड पोलीस ठाणे येथे तक्रार दिली होती. म्हणून या सर्वांना पोलिसांनी अटक केली होती मात्र या सर्वांची जामीन होऊन सुटका होताच त्यांनी पुन्हा बाहेर येताच लियाकत बेग यांच्या घरी जाऊन शिवीगाळ करत मारहाण केली आणि पुन्हा जिवे मारण्याची धमकी दिली. या सर्वांपासून जीवितास धोका असल्याने लियाकत बेग यांनी थेट जिल्हा पोलीस अधीक्षकांना गाठून या सर्वांना अटक करावी या सर्वांकडून आपल्या जीवतास धोका असल्याचे म्हटले आहे. याप्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक कोणती कारवाई करतात याकडे लक्ष लागले असल्याचे मिर्झा लियाकत बेग यांनी म्हटले आहे. आरोपींचा जामीन रद्द करण्यासाठी हायकोर्टात जाणार आरोपी बाबा खाजा शेख, आयेशा बाबा शेख, शेख शहेनाज अब्दुल शेख (गिड्डी), शेख हिना यांच्यापासून मला व माझ्या कुटूंबाला धोका आहे, ते काहीही बरेवाईट करु शकतात, त्यासाठी त्यांचा जामीन रद्द करण्यासाठी उच्च न्यायालयात जाणार असल्याचे पिडीत लियाकत बेग यांनी सांगीतले.

# क्रांतिसिंह नाना पाटील शेतकरी विकास प्रतिष्ठानचे २०२५ चे पुरस्कार जाहीर बीड येथे ३ ऑगस्टला विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते भव्य सन्मान सोहळा













बीड (प्रतिनिधी) दि.२१ : क्रांतिसिंह नाना पाटील शेतकरी विकास प्रतिष्ठानच्या वतीने २०२५ चे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. क्रांतिसिंह नाना पाटील व अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आणि शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी सामाजिक चळवळीत कार्य करणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराने सन्मानित केले जाते. यंदा ३ ऑगस्ट रोजी बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार असून महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरित केले जाणार आहेत. कृषी, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, कला, क्रीडा, पर्यावरण, पत्रकारिता आदी क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. या गौरव सोहळ्याचे आयोजन क्रांतिसिंह नाना पाटील शेतकरी विकास प्रतिष्ठानच्या वतीने आणि विविध मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले आहे. पुरस्कार सोहळ्याबाबत माहिती प्रतिष्ठान आणि शेकापचे नेते भाई मोहन गुंड, भाई अशोक रोडे, ॲड. भाई नारायण गोले, भाई बापूसाहेब सोळके यांनी दिली आहे.

### पुरस्कार जाहीर झालेल्या मान्यवरांची नावे

राजकीय क्षेत्र : विस्थापित समाजासाठी लोकशाहीत अधिकार मिळवून देण्यासाठी लढा देणारे अरुण जाधव; कृषी क्षेत्र : हजारो झाडांचे वाटप व शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी कार्य करणारे राजाभाऊ देशमुख; पर्यावरण संवर्धन : समाजात पर्यावरण जनजागृती करणारे सुधाकर देशमुख; आरोग्य संवर्धन : व्यसनाधीन व्यक्तींना सावरून जीवनाला दिशा देणारे डॉ. संदीप तांबारे; सांस्कृतिक कला : शाहिरीच्या माध्यमातून महाराष्ट्रभर समाजप्रबोधन करणारे अकलूजचे शाहीर राजेंद्र कांबळे; शैक्षणिक क्षेत्र : कॉ. राजकुमार कदम; कामगार चळवळ : कामगारांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या उज्वला पडलवार; सांप्रदायिक क्षेत्र : ह.भ.प. श्यामसुंदर सोन्नर; शोध पत्रकारिता : सशक्त शोध पत्रकारिता करणारे सांगलीचे संपत मोरे; क्रीडा क्षेत्र : उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या धारूरच्या जागृती अमरजीत तिवारी.


# प्रहारचा एल्गार; सरकारविरोधात चक्काजाम, बच्चू कडू आक्रमक भूमिकेनंतर धरपकड, राज्यात वातावरण तापलं

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह शेतमजूर, दिव्यांग, ग्रामपंचायत कर्मचारी आदींसाठी बच्चू कडू आक्रमक झाले आहेत. प्रहार संघटना राज्यात चक्काजाम आंदोलन करणार आहे. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा या मागणीसाठी बच्चू कडू यांनी विदर्भात पदयात्रा काढली. त्याचवेळी त्यांनी आंदोलनाची दिशा ठरवली. आता सरकारला आश्वासनांची आठवण करुन देण्यासाठी रस्त्यावरची लढाई सुरू होणार आहे.

शेतकऱ्यांच्या विविध मागणीसाठी बच्चू कडू यांनी 8 जूनपासून आंदोलनाचे हत्यार उपासले होते. मोझरी येथील गुरुकुंज आश्रमात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या समाधीसमोर त्यांचे हे उग्र उपोषण सुरू होते. सरकारच्या यशस्वी मध्यस्थीनंतर 6 दिवसांनी त्यांनी उपोषण मागे घेतले. मंत्री उदय सामंत यांनी मोझरीत येऊन सरकार बच्चू कडू यांच्या मागणीबाबत सकारात्मक असल्याची भूमिका त्यावेळी मांडली होती. त्यानंतर बच्चू कडू यांनी पश्चिम विदर्भातील जिल्ह्यातून सात बारा कोरा करण्यासाठी पदयात्रा काढली. सरकारलाच वाटते महाराष्ट्र पेटत राहिला पाहिजे महाराष्ट्रभरात सर्व ठिकाणी चक्काजाम आंदोलन होणार आहे. कर्जमाफीसाठी शेतकरी समोर येत आहे. मच्छीमार दिव्यांग मेंढपाळांचे प्रश्न आहे. सरकार कडूनच दिशाभूल करण्याच काम करत जात आहे. आमचं आंदोलन आता सरकारच्या हातात राहणार नाही. सरकारलाच महाराष्ट्रात अशांतता पाहिजे. सरकारलाच वाटते



महाराष्ट्र पेटत राहिला पाहिजे. म्हणूनच कर्जमाफीची घोषणा करत नाही, असा घणाघात बच्चू कडू यांनी घातला. त्यामुळे बच्चू कडू आता उग्र आंदोलन करणार अशी चर्चा होत आहे. प्रहार संघटनेला विरोधकांनी साथ दिल्यास राज्यात मोठे आंदोलन उभे ठाकण्याची शक्यता आंदोलक व्यक्त करत आहेत.



पावसाचा बदलता पॅटर्न, सरकारची धोरण, कृषीमंत्री कायम वादात सापडत असल्याने प्रहारच्या आंदोलनाला धार येण्याची शक्यता आहे. सध्या शेतीची कामे सुरू असली तरी या आंदोलनाला पाठिंबा मिळण्याची शक्यता आहे.

सरकारचा दबावतंत्राचा वापर काल प्रहारच्या दोनशे कार्यकर्त्यांना नागपूर मध्ये अटक करून ठेवली आहे. आमच्यावर दबाव तंत्राचा वापर केला जात आहे. ज्या ठिकाणी पोलीस अधीक्षक आंदोलन करू देणार नाही त्या ठिकाणी आम्ही पुन्हा चक्काजाम आंदोलन करू, असा इशारा बच्चू कडू यांनी सरकारला दिला आहे. ठिकठिकाणी चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाला विविध संघटना, मनसेने पाठिंबा जाहीर केला आहे.

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या मराठवाडा उप विभागीय कार्यालयाचे २७ जुलै रोजी बीड येथे उद्घाटन

बीड, दिनांक 24 : मराठवाड्यातील महामंडळाची वाढती व्याप्ती लक्षात घेऊन, अण्णासाहेब पाटील विकास फाउंडेशनच्या विशेष सहकार्यातून कार्यान्वित होणाऱ्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या मराठवाडा विभागाच्या "उपविभागीय कार्यालयाचे उद्घाटन" रविवार, २७ जुलै, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे होत आहे. या कार्यालयाच्या उद्घाटन समारंभाच्या निमित्ताने बीड येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन महामंडळाचे विभागीय समन्वयक प्रवीण आगवण पाटील यांनी केले.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनेचा मराठवाड्यात प्रचार, प्रसारासाठी व्याप्ती वाढवणे. मराठवाड्यातील जिल्ह्यातील लाभार्थ्यांची महामंडळाच्या निगडीत कामाकरीता ई-सेवा केंद्र, CSC सेंटर, खासगी ऑनलाईन सेंटर अथवा एजंटकडून होणारी फसवणूक टाळणे. मराठवाड्यातील मराठा समाजापर्यंत पोहोचून त्यांना महामंडळाच्या योजनांचा लाभ मिळवून देऊन जास्तीत जास्त लाभार्थी उद्योजक घडविणे. यासाठी बँकेत प्रलंबित कर्ज प्रकरण संदर्भातील तक्रार निरसन करून व्याज परतावा त्रुटींबाबत मार्गदर्शन करून Claim Hold, Sanction Hold विषयी हेल्पलाईन सेंटरच्या माध्यमातून समस्या निवारण करणे असे या उप विभागीय कार्यालयाच्या उद्घाटना मागील उद्दिष्टे आहेत. मराठवाडा विभागातील हे कार्यालय सुसज्ज आणि अद्ययावत असणार आहे. पात्र लाभार्थ्यांना या ठिकाणी महामंडळाकडून देण्यात येणाऱ्या सर्व सुविधा येथे उपलब्ध असतील. या उपविभागीय कार्यालयामुळे मराठवाड्यातील लाभार्थी यांचा वेळ वाचेल. अधिकाधिक लाभार्थी यांना महामंडळाच्या योजनांचा लाभ देण्यासही लाभार्थी व महामंडळ यांना सोयीचे होईल. तालुकास्तरावर देखील महामंडळाच्या योजना पोहोचविण्यासाठी आगामी काळात दौरे करण्यात येणार असल्याचे महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी सांगितले.

अण्णासाहेव पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनेची व्याप्ती वाढवण्यासाठी उप विभागीय कार्यालय राजू कॉम्प्लेक्स,२रा मजला, हिना हॉटेल समोर, जालना रोड, बीड येथे सुरु करण्यात येत आहे. या निमित्त यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या महामंडळाच्या "उप विभागीय कार्यालय उद्घाटन समारंभास" जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे व मेळाव्यात सहभागी होऊन महामंडळाच्या योजनेची माहिती घ्यावी. याबरोबरच लाभार्थ्यांनी स्वतःची समस्या निवारण करून घ्यावे, असे आवाहन श्री. आगवण पाटील यांनी केले.
******

## हिवरवाडी येथे राज्यव्यापी चक्काजाम आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

### सर्व पक्षी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित



चकलंबा प्रतिनिधी:- असलम सय्यद

गेवराई तालुक्यातील हिवरवाडी येथे माजी राज्यमंत्री बच्चू कडु यांनी मांडलेल्या शेतकरी कर्जमाफी, शेतीमालाला हमीभावावर २० टक्के प्रोत्साहन बोनस, कामगार, दिव्यांग व विधवा महिलांना मासिक ६००० रुपये मानधन, तसेच रोजगार, शिक्षण व आरोग्य या मूलभूत मुद्यांवर तातडीने निर्णय घ्यावेत या मागण्यांसाठी पुकारलेल्या राज्यव्यापी चक्का जाम आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी गेवराई चकलांबा रोड वर हिवरवाडी फाटा येथे लोकशाही मार्गाने रस्ता रोको व चक्क जाम आंदोलन करण्यात आले.आज गुरुवार, दि.२४ रोजी सकाळी ८:३० वाजल्यापासून रस्ता रोको करण्यात आले. यावेळी तहसील कर्मचारी मंडळ अधिकारी काळे तलाठी गरुडकर यांना पत्र देहून तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री पर्यंत पोहोचणार आहेत.तसेच पोलीस बंदोबस्त मोठया प्रमाणात होते. तसेच गावातील निवेदन कर्ते सामाजिक कार्यकर्ते फिरोज शेख, शकील शेख, इकबाल सय्यद तसेच गावातील सर्व पक्षी कार्यकर्ते शेतकरी वर्ग, ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

## सरस्वती माध्यमिक विद्यालय,आकुर्डी,पुणे 35 शाळेत बालविज्ञान व पर्यावरण मंडळ अंतर्गत व्याख्यानाचे आयोजन.

निगडी: विज्ञान म्हणजे कार्यकारणभाव समजून घेणे.कोणत्याही गोष्टीमागे काही ना काही कारण असते,ते समजून घेण्याचे शास्त्र म्हणजेच विज्ञान.दैंनदिन जीवनात नाना घटना घडत असतात,पण त्या का घडतात?हे समजून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे.प्रश्न विचारा पुन्हा पुन्हा...तेव्हा आपल्याला नेमके कारण समजेल.म्हणून प्रत्येक गोष्टीच्या मागचे कारण समजून घेऊन त्याप्रमाणे जीवन वाटचाल करणे गरजेचे आहे.समाजात नाना चमत्कार करून लोकांना फसविणारे अनेक बाबा पहायला भेटतात.पैशाचा पाऊस पाडणारेच बाबा लोक त्यांच्या कार्यक्रमाचे पैसे मागतात हे ही साधे आपल्याला समजून घेता येत नाही.अशा विचित्र गोष्टींचे बळी आपण ठरतो असे विचार आपल्या व्याख्यानातून उत्तम जोगदंड,दिगंबर कट्यारे यांनी व्यक्त केले.याचसाठी प्रशालेत "चमत्कारमागील विज्ञान समजून घेणे"...या विषयाचे प्रात्यक्षिकातून मार्गदर्शन करण्यात आले.त्यानंतर त्याच्यामागचे विज्ञान समजून सांगण्यात आले,विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे निरसन करण्यात आले.यासाठी मा.दिगंबर कट्यारे(कार्यवाह,वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प,महाराष्ट्र अंनिस),उत्तम जोगदंड(कार्यकारी संपादक अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका),क्रांती पोतदार(अंधश्रद्धा निर्मूलन समिती सदस्य),गणेश तामचिकर(अंधश्रद्धा निर्मूलन समिती सदस्य)यांनी मोलाचे मार्गदर्शन प्रात्यक्षिकासह करून दाखविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल वांगेकर,निवेदन व आभार प्रतिमा काळे तर विशेष सहकार्य कैलास कोशिरे,सुकन्या जाधव यांनी केले

## शेतकरी कर्जमाफीसाठी मेंढ पाळा सहित माजलगाव प्रहारचा चक्काजाम आंदोलन

# पाच संघटनेचा व पक्षाचा उपस्थित राहून पाठिंबा

किसन बी पवार माजलगाव प्रतिनिधी... दि.२४.०७.२०२५. शेतकरी कर्जमाफीच्या प्रमुख मागणीसाठी २४ जुलै रोजी प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष बच्चुभाऊ कडू याच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय कार्यकर्ते संपूर्ण महाराष्ट्र मध्ये चक्काजाम आंदोलन करण्यात आले माजलगाव तालुक्यातील वसंतराव नाईक चौक परभणी फाटा येथे साकळी ११:३० वाजता चक्काजाम आंदोलनास सुरवात करण्यात आले हे आंदोलन दोन तास चालू होते या आंदोलनात शेतकरी तसेच दिव्याग बाधव, मेंढ्या सहित मेंढपाळ मालक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते गेल्या काही महिन्यापासून प्रहार चे संस्थापक अध्यक्ष मा. बच्चुभाऊ कडू यांनी शेतकरी सातबारा कोरा करण्यासाठी कर्जमाफीची मागणी शासनाकडे केली आहे त्यासाठी त्यांनी आमरण उपोषणही

केले नंतर पदयात्रा काढली आता कर्जमाफी बाबत



प्रत्येकाने आवाज उठवणे गरजेचे असल्याने आंदोलनाच्या पुढील टप्पा म्हणून २४ जुलै रोजी राज्यभर चक्काजाम आंदोलन करण्यात आले आंदोलनात कोणत्याही पक्षाचा झेंडा नाही केवळ शेतकरी, दिव्यांग, मेढपाळ, मछीमार, कर्मचारी याच्या विविध प्रश्नासाठी एकत्र येऊन शासनाकडे कर्जमाफीची मागणी जोर कस पणे मांडण्यासाठी दोन तास चक्काजाम आंदोलन केले आहे या आंदोलनामध्ये संघटनेचे नेते मा भाई गगाभिशन थावरे, एडवोकेट मा.नारायण गोले पाटील, काँग्रेसचे तालुकाप्रमुख मा नारायण होके पाटील, आझाद क्रांती सेनेचे मा.राजेजी घोडे, मौलाना आझाद युवा मंचचे जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस, शेतकरी क्रांती सेनेचे योगेश कानडे, वीर शंभू संघटनेचे गणेश शिंदे , आजाद क्रांतीचे तालुकाध्यक्ष अशोक ढगे व पदाधिकारी तसेच आजी माजी सैनिक संघटनांनी मा.वसंतराव नाईक चौक परभणी फाटा माजलगाव येथे येऊन चक्काजाम आंदोलनात सहभागी होऊन जाहीर पाठिंबा दिला हे आंदोलन माजलगाव प्रहार जनशक्तीचे तालुका अध्यक्ष गोपाळ पैजणे, नितीन कांबळे, भारत डोंगरे हरिचंद्र जाधव विजय जोगडे अशोक अर्जुन लक्ष्मण गरड, विकास जगताप,विलास लवाळे, श्रीराम कोरडे, युवराज राठोड, महादेव डाके, पांडुरंग कुकडे, गणेश नागणे, अनेक शेतकरी व दिव्यांग बांधव पदाधिकारी उपस्थित होते.

# शिक्षकांसाठी महत्त्वाची बातमी:शालार्थ प्रणालीसाठी सुधारित नियमावली जाहीर; नियम मोडल्यास शाळा व्यवस्थापनावर फौजदारी कारवाई

पुणे | प्रतिनिधी राज्यातील नागपूर जिल्ह्यात उघडकीस आलेल्या बनावट 'शालार्थ आयडी' घोटाळ्यामुळे शिक्षण विभागाची मोठी बदनामी झाली. यामुळे जाग आलेल्या शिक्षण आयुक्तालयाने राज्यभरातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी भरती प्रक्रियेतील पारदर्शकता वाढवण्यासाठी 'शालार्थ' प्रणालीसाठी नवी सुधारित नियमावली लागू केली आहे. शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह यांनी यासंदर्भातील आदेश नुकतेच जारी केले आहेत. त्यानुसार आता शिक्षक पदाची वैयक्तिक मान्यता, शालार्थ आयडी आदेश, नियुक्ती आदेश आणि रुजू अहवाल शालार्थ पोर्टलवर अपलोड करणे अनिवार्य करण्यात आले आहे. ही कागदपत्रे विभागीय शिक्षण उपसंचालक किंवा संबंधित माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय अध्यक्ष यांच्या स्तरावरून अपलोड करावी लागणार आहेत. काय होते 'शालार्थ' घोटाळ्याचे मूळ कारण? नागपूरसह राज्यभरात अनेक ठिकाणी शालार्थ प्रणालीचा गैरवापर करून शेकडो बनावट शिक्षकांची नियुक्ती दाखवली गेली होती. या फसव्या नियुक्तींमुळे कोट्यवधी रुपयांचा अपहार झाल्याचे उघडकीस आले होते. या पार्श्वभूमीवर शासनाने आता नियम अधिक कडक केले आहेत. नवीन नियमावलीचे ठळक मुद्दे: 7 जुलै 2025 नंतर





नियुक्त शिक्षक/कर्मचाऱ्यांच्या सर्व कागदपत्रांची अपलोडिंग अनिवार्य 2012 ते 2025 दरम्यान नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सर्व कागदपत्रे 30 ऑगस्ट 2025 पर्यंत अपलोड करणे बंधनकारक नियम न पाळणाऱ्या शाळा व्यवस्थापन व अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई 'शालार्थ' प्रणाली म्हणजे काय? 'शालार्थ' ही महाराष्ट्र शासनाची एक केंद्रीकृत डिजिटल प्रणाली आहे. सरकारी व अनुदानित शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन, सेवा पुस्तिका, नियुक्ती तपशील इत्यादींचे व्यवस्थापन या प्रणालीद्वारे केले जाते. ही माहिती कोषागार आणि अन्य वित्तीय यंत्रणांशी थेट जोडलेली असते. प्रभाव: या नव्या नियमावलीमुळे शिक्षक भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक, नियंत्रित आणि डिजिटली ट्रॅक केली जाणारी होणार आहे. यातून शैक्षणिक संस्थांतील बनावटगिरीवर लगाम बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचे म्हणणे: या निर्णयाचे स्वागत करताना तज्ज्ञांचे मत आहे की, "डिजिटल पडताळणी व दस्तऐवज अपलोड अनिवार्य केल्याने बनावट भरतीसारख्या घटनांवर नियंत्रण येईल आणि शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होईल."

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com